**PRESS MONITOR**

Publication : Rashtratej
Edition : Pune
Date : December 23, 2015

Headline: Brand 'moonbow'enters air purifier market

# ब्रँड 'मूनबो'ने एअर प्युरिफायरच्या बाजारपेठेत प्रवेश केला

■ पुणे :

'मूनबो' हा आज अनावरण झालेला नवीन ब्रँड आहे. एचएसआयएल लिमिटेडचा 'मूनबो' हा ब्रँड कंपनीच्या ग्राहक उत्पादन विभागातील वाढत्या स्वारस्याचा प्रमुख ब्रँड असेल.

'मूनबो'चे ब्रँड वचन 'एक्स्पेक्ट दि अनएक्स्पेक्टेड' हे आहे, ज्याचा सर्वसामान्य भाषेत काहीतरी असे जे अपेक्षित नसेल, आश्चर्याचा धक्का देणारे असेल. या ब्रँडचा दर्जा विविधांगी उत्पादन अनुभवांद्वारे आणि महत्त्वाच्या फायद्यांद्वारे पाहता येईल, जे त्यांचे लक्ष्य असलेल्या ग्राहकांना देण्यात येईल. ग्राहकांना त्याच्या/तिच्या कुटुंबाच्या एकूणच कल्याणाची काळजी असते आणि एक चांगले तसेच निरोगी आयुष्य त्यांना जगायचे असते.

या ब्रँडखाली आणले जाणारे एअर प्युरिफायर हे एक पहिले उत्पादन आहे. प्युरी ५ तंत्रज्ञानाने युक्त प्रत्येक मॉडेलमध्ये पाच टप्प्यांची फिल्टरेशन प्रक्रिया मग किंमत काहीही असो देणारे 'मूनबो' हे एक अत्यंत खास आणि वेगळे उत्पादन आहे, ज्याचा अनुभव भारतीय ग्राहकाने आजवर घेतलेला नाही.

५ टप्पे फिल्टरेशनचे महत्त्व त्याच्या सूक्ष्मकणांच्या असुरक्षित पातळ्या दूर करण्याची क्षमता असून त्याला हवेतील २.५ मायक्रोमीटरपर्यंतचे सूक्ष्मकणांचे प्रदूषण किंवा (पीएम)ही म्हटले जाते. त्यात धूळ, स्वयंपाक, ऑटोमोबाइल उत्सर्जन, जंगलातील आग, शेतीतील जळण इत्यादींचा समावेश असून त्यामुळे आपल्या रोजच्या श्वसनाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. त्यांचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढू लागले आहे. येथेच मूनबो एअर प्युरिफायर्स त्यांच्या अद्ययावत आधुनिक तंत्रज्ञानामुळे उपयुक्त ठरतात. या अनावरणाच्या निमित्ताने बोलताना श्री. संदीप सोमाणी, सहव्यवस्थापकीय संचालक, एचएसआयएल लिमिटेड म्हणाले की, ''आम्ही एक कंपनी म्हणून बाजारात नवीन वाढीच्या संधी शोधल्या आहेत, ज्या आमच्या सध्याच्या व्यवसायालाही उपयुक्त ठरतील आणि नवीन बिझनेस विभागांमध्ये प्रयत्न करण्यासाठीही संधी देतील. त्या घरांशी व ग्राहकांच्या जीवनशैलीत सुधारणेशी जोडलेल्या असतील. एअर प्युरिफायरच्या वर्गात प्रवेश हा बाजारातील सकारात्मक संधींवर आधारित आहे, ज्याला पर्यावरण वातावरण आणि स्मार्ट जगून ताजी हवा घेण्याच्या ग्राहकाच्या मागणीशी सुसंगत आहे. आमच्या ब्रँडच्या विभागात आणखी एक उत्पादन आणण्याच्या निर्णयाबाबत आम्हाला आमच्या उत्पादनांमध्ये बदल करण्याचीही गरज जाणवली, कारण 'मूनबो' आरोग्य व ताजेपणा यांच्याशी संबंधित नवीन उत्पादनांवर लक्ष केंद्रित करेल. आम्ही कामाच्या पहिल्या वर्षात पाच टक्के बाजारवाट्यावर लक्ष केंद्रित करत असल्यामुळे कंपनीच्या भविष्याप्रति असलेल्या दृष्टीकोनाचे हे एक अत्यंत महत्त्वाचे मूल्यमापन आहे. आम्ही पुढील तीन वर्षांमध्ये सर्वोच्च ३ पैकी होण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे, असे ते म्हणाले.'' मूनबो एअर प्युरिफायर्स इ-वाणिज्य (ॲमेझॉन) आणि प्रत्यक्ष आऊटलेट (क्रोमा)मध्ये एकाच वेळी अनावरण केले जात आहेत. या तीन मॉडेल्सची सुरुवातीची किंमत ३४,९९०/- रुपये, १५,९९०/- रुपये आणि १२,९९०/- रुपये आहे. अनावरणाच्या पहिल्या टप्प्यात मूनबो एअर प्युरिफायर्स निवडक टायर अ शहरांमध्ये जिथे एक्यूआय (एअर क्वालिटी इंडिया) खराब आहे उपलब्ध असतील.